**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,**
**आदेश क्रमांक : नपसु -२००१/प्र.क्र.१/२००१/५**
**वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१**
**दिनांक : १ जानेवारी २००१.**

वाचा
१) नगर विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभाग, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्रमांक एमयुजी-५४७५/२१९४/युडी-१०(सी) दिनांक ४.६.१९७६.
२) संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमई - १०७६/II, दि. ४.६.१९७६.
३) नगर विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक - डीएमए-१०७७/९४५/सीआर-१९५/युडी-९, दिनांक २२.९.१९७७
४) नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक - एमसीओ-२२८४/१११८ / सी-आर-२५१/८४/युडी-१४, दिनांक ६ फेब्रुवारी १९८५.
५) नगर विकास विभाग पत्र क्रमांक एमसीओ-२२८५/३२५/सीआर-४४/नवि-१४, दि.२२.२.१९८५.
६) संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडील आदेश क्र. डीएमई - १०९१/सीआर-५३, दि.२०.७.१९९१
७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. एमसीओ-२२९७/५१६/सीआी-५३/९/युडी-१४, दि. ६.६.१९९२

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीप्रमाणे ज्नगरपरिषदांच्या कामकाजावर क्षेत्रीय पातळीवर म्हणजेच प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांचे पातळीवर प्रभावी नियंत्रण असणे आवश्यक आहे. या संदर्भांत यापूर्वी संचालाालयाकडून वेळोवेळी अधिकारांचे विकेद्रीकरण करून आदेश काढण्यात आले होते परंतु असे दिसून आले आहे की, प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी या पातळीवर यापूर्वी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराच्या वापराबद्दल काही प्रमाणात संदिग्धता आहे. ही संदिग्धता दूर करणे जरूरीचे आहे. त्या शिवाय क्षेत्रीय पातळीवर अधिकारांचे अधिक प्रमाणात विकेद्रीकरण होवून वापर करणे जरूरीचे आहे असे संचालाालयाचे मत आहे.

प्रशासन गतीमान करता यावे याकरीता अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्याचे शासनाचे धोरण आहे. हे ध्यानात ठेवून नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त अधिकारांचे विकेंद्रीकरण व्हावे याकरीता खालील आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे (यापुढे सुलभ संदर्भासाठी "अधिनियम" असा उल्लेख) कलम ७४ चे पोटकलम २ व ३ चा परंतुक अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून तसेच या संचालनालयातील आधीच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करून संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई हे त्यांना अधिनियमन अंतर्गत असलेले व शासनाने त्यांना वेळोवेळी प्रदान केलेले "परिशिष्ट-१" मधील अधिकार स्वत:कडे राखून ठेवत आहेत.

०२. पुढे असे ही स्पष्ट करण्यात येत आहे की, वरील परिशिष्ट-१ मधील अधिकार वगळता नमूद कलम ७४ चे पोटकलम ३ अन्वये संचालकांना असलेले व शासनाने त्यांना वेळोवेळी प्रदान केलेले परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या अधिकाराचा वापर करण्यास संबंधीत प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन हे सक्षम आहेत. त्याप्रमाणे प्रादेशिक संचालकांनी या अधिकारांचा वापर करावा.

०३. संचालक, नगरपरिषद प्रशासन हे त्यांना अधिनियमातील प्राप्त अधिकार/शक्ती परिशिष्ट ३ व परिशिष्ट ४ मध्ये नमूद केल्यानुसार अनुक्रमे प्रादेशिक संचालक व जिल्हाधिकारी यांना प्रदान करीत आहेत.

०४. या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले अधिकार व शक्ती तसेच संचालकाबरोबरच प्रादेशिक संचालक, - नगरपरिषद प्रशासन वापरण्यास सक्षम असलेले अधिकार यांचा सर्व प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन व सर्व जिल्हाधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील नगरपरिषदांच्या कामकाजावर पर्यवेक्षण वाढविण्याकरिता आणि नियंत्रण प्रभावी करण्याकरिता पुरेपूर वापर करावा ही विनंती.

०५. हे आदेश ०१.०१.२००१ पासून अंमलात येतील.

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
३) अध्यक्ष, नगरपरिषदा (सर्व)
४) मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
५) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
६) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती व नागपूर.

**प्रत माहितीसाठी**

१) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सह सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
४) नगर विकास विभाग, (नवि-१४) मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
५) कार्यासन अधिकारी, (सर्व) नगरपरिषद प्रशासन संचालालय.
६) निवड नस्ती.

## प्रादेशिक संचालकांना प्रदान केलेले अधिनियमातील तरतुदीनुसार संचालकांना असलेले मूळ अधिकार
## (संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई याचे
## आदेश क्र नपसु-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दिनांक ०१. १.२००१ अन्वये)

### परिशिष्ट - ३

| अधिनियमातील कलम | विषय |
|---|---|
| ९(२) | आरक्षणासह नगरपरिषदेच्या सदस्यांची संख्या निश्चित करणे. |
| ७१ | कलम ७० अन्वये विषय सा मतीच्या विषय वाटपाच्या उपविधींना मान्यता देणे. |
| ७१(अ) | स्थायी समिति वा विषय समितीचे अधिकार व कर्तव्ये आम सभा किंवा विशेष विषय समतीद्वारे पार पाडण्याच्या प्रस्तावास मान्यता देणे. |
| ७५(अ) | (अ)श्रेणी-३ मुख्याधिकाऱ्यांची विभागा अंतर्गत बदली.<br>(ब) श्रेणी-३ मुख्याधिकारी यांच्यावर किरकोळ शिक्षा ठोठावणे.<br>(क)श्रेणी-३ मुख्याधिकारी यांच्यावर किरकोळ शिक्षा ठोठावणे. |
| ७९(६) | कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेने दिलेल्या शिक्षेविरूद्धचे अपिलाची सुनावणी व निर्णय. |
| ९७(अ) आणि (ब) (१) (२) | नगरपरिषदेच्या हद्दीबाहेर निधी खर्च करण्यास मान्यता देणे. |
| ३०१(एफ)(दोन) | कलम १७३ पोटकलम ३ अन्वये विक्री करण्यात आलेल्या किंवा भाडेपट्ट्याने दिलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधीच्या दाव्याच्या समेटास मान्यता देणे. |
| ३०८(४) | जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश बदलणे, रद्द करणे इत्यादी. |
| ३२३(३)(४) | उपविधी स्वीकारण्यास भागा पाडणे. |
| ३४१क्यू (३) अणि (४) | आद्योगिक नगरांचा ठराव रद्द करण्यासंबंधीचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द करुन निरसीत करणे. |

(भगवान सहाय )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय